पुढारी | MY कोल्हापूर रविवार, २८ एप्रिल २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये विल्यम शेक्सपिअर जयंतीनिमित्त कार्यक्रम

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे नाटककार व कवी विल्यम शेक्सपिअर यांच्या जयंतीनिमित्त 'ए ट्रिब्यूट टू विल्यम शेक्सपिअर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. आर. कुंभार होते. कार्यक्रमात कला व वाणिज्य महाविद्यालयातील रितेश प्रजापती, मुस्कान मुल्ला, करण पाटील, समृद्धी कुलकर्णी, रश्मिता गौडा यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. शिल्पा भोसले, कला व वाणिज्य विभागप्रमुख प्राध्यापिका उज्ज्वला हिरकुडे, अश्विनी गायकवाड-माने, माधवी देशपांडे यांनी परिश्रम घेतले.

29/04/2024

पुण्यनगरी
रविवार, २८ एप्रिल २०२४



# 'विवेकानंद 'मध्ये शेक्सपियर जयंती कार्यक्रम

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातर्फे प्रसिद्ध नाटककार व कवी विल्यम शेक्सपियर यांच्या जयंतीनिमित्त 'ए ट्रिब्यूट टू विल्यम शेक्सपियर' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. या कार्यक्रमात रितेश प्रजापती, मुस्कान मुल्ला, करण पाटील, समृद्धी कुलकर्णी, रश्मिता गौडा, साक्षी बगाडे, राजश्री शितोळे, वैष्णवी पवार या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्टाफ सेक्रेटरी प्रा. शिल्पा भोसले, कला व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. उज्ज्वला हिरकुडे, अश्विनी गायकवाड-माने, माधवी देशपांडे आदींचे सहकार्य लाभले.



# 'ई-कॉमर्स' जागरुकता अभियान उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज अधिकारप्रदत्त स्वायत्त) मधील वाणिज्य विभागामार्फत दि. १९ मार्च ते २५ एप्रिल या कालावधीत इलेक्ट्रॉनिक कॉमर्स जागरुकता अभियान राबवण्यात आले. यामध्ये सध्याच्या इलेक्ट्रॉनिक कॉमर्स अंतर्गत येणाऱ्या विभिन्न गोष्टीमुळे सर्वसामान्य नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करणे गरजेचे आहे, यासंदर्भात परिपत्रकामार्फत बी.कॉम भाग-२ आणि भाग-३ च्या विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. यामध्ये शहरासह जिल्ह्यातील ५६ गावांतील १३०० पेक्षा जास्त कुटुंबांमध्ये जनजागृती केली. या अभियानाचे समन्वयक म्हणून डॉ. उमेश दबडे यांनी काम पाहिले, तसेच प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सनी काळे, डॉ. अमोल मोहिते, डॉ. योगेश माने यांचे सहकार्य लाभले.

29/04/2024

29.4.24